**प्रेसनोट** **दिनांक ०४/०७/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

### गुन्हा करुन फरार असलेल्या आरोपीच्या पोलीसांनी मुसक्या आवळल्या.

समर्थ पोलीस ठाणे हद्दीत १०६२ न्यू नाना पेठ पुणे या ठिकाणी बांगडी विक्री व्यवसाय करणारी ७५ वर्षाची वृद्ध महिला श्रीमती जैनबी कमरुउद्दीन शेख रा. सदर हया नेहमीप्रमाणे दिनांक १८/४/२०१९ रोजी सायंकाळी आपली सूनबाई समवेत व्यवसाय करीत असताना सायंकाळी ७-३० ते ८-०० वा. चे सुमारास सदर भागातील लाईट गेली होती. त्यावेळी एका तरुणाने अचानकपणे श्रीमती जैनबी कमरुद्दीन शेख यांचे डोक्यावर जोरात काचेच्या जाड तुकडयाने घाव घालून दुखापत केली होती त्यानंतर तो पळुन जाताना त्याला स्थानिकांनी पकडले होते. त्याने हे कृत्य त्यास नाजीम शेख नावाचे तरुणाने करण्यास प्रवृत्त केले होते अशी माहिती दिली होती. त्या तरुणास पोलीस स्टेशनला हजर करुन त्याचे विरोधात समर्थ पोलीस ठाणे पुणे येथे गुन्हा नोंद क्र. १२०/२०१९ भादवि.३२४,३४ प्रमाणे गुन्हा नोंदविला होता. या गुन्हयात हल्लेखोर तरुण आकाश संदीप गायकवाड रा. उरुळी कांचन , पुणे याला आणि त्याचे इतर चार सहकारी यांना समर्थ पोलीसांनी अटक केलेली होती. या हल्ल्याचे कटात सहभागी असलेला परंतु फरार झालेला आरोपी नामे - आजीम अब्दुल वजीर शेख रा.लेन नं.१२ सययदनगर, हडपसर पुणे याचे मागावर समर्थ पोलीस होते. तो आज दि.४/७/२०१९ येवलेवाडी सर्व्हे नं.६४, परिसरात येणार आहे येणार असल्याची माहिती ही पोहवा. राजस शेख यांना मिळाली होती .त्यानुसार श्री. बाळकृष्ण कदम , वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोस्टे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा. राजस शेख , पोहवा. सुशील लोणकर , पोहवा. रमेश काळे , पोशि. निलेश साबळे पोशि. अनिल शिंदे , पोशि. साहिल शेख वगैरे यांनी सदर भागात जाऊन वॉच ठेवून आजीम शेख हा सदर ठिकाणी मिळून येताच त्यास ताब्यात घेऊन वपोनि. समर्थ पोस्टे यांचेकडे हजर केले . त्यास दाखल गुन्हयात आज रोजी १७-०० वा. अटक करण्यात आलेली आहे. अशा रितीने सुमारे अडीच महिने पोलीसांना गुंगारा देणारे आरोपीच्या अखेर समर्थ पोलीसांनी मुसक्या आवळल्या.